# <u>प्रेस नोट</u>

दुचाकी वाहनचोरी करणा-या दोन सराईत आरोपींकडुन किंमत अंदाजे ५,४०,०००/- ची एकुण ११ दुचाकी वाहने हस्तगत करुन पुणे शहर आयुक्तालयातील ८ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

समर्थ पोलीस स्टेशन हद्दीत होणा-या वाहनचोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध व्हावा याकरीता वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांप्रमाणे तपास पथकातील पोलीस आधिकारी व कर्मचारी यांनी तपासादरम्यान मिळालेल्या सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घेत असताना दि.३१/०७/२०१७ रोजी १६/०० वा. शाहु उद्यानासमोर नाकाबंदी करीत असताना सी.सी.टी.व्ही. फुटेज मधील संशईत आरोपी हिरो-होंडा पॅशन गाडीवरुन येताना दिसले त्यांना हटकताच ते पळुन जाऊ लागले त्यांचा पाठलाग करुन ताब्यात घेऊन त्यांच्याकडे लायसन्स व गाडीचे कागदपत्रांबाबत चौकशी केली असता, ते उडवा-उडवीची व असमाधानकारक उत्तरे देऊ लागले. त्यांना समर्थ पोलीस स्टेशन येथे आणुन अधिक चौकशी केली असता त्यांनी त्यांचे नावे १) विठ्ठल रामा घोगरे, वय-२० वर्ष, रा. रूपाली हॉटेलच्यामागे, अंकुश शेंडगे यांचे खोलीत,कॅनाल शेजारी,चौफुला,ता.दौंड जि-पुणे २) अभिजीत उॅर्फ पप्या गणपत चव्हाण, वय २२ वर्ष रा. बजाज शोरूम शेजारी,संतोष राऊत यांचे खोलीत,चौफुला,ता.दौंड जि-पुणे असे असल्याचे सांगितले. नमुद आरोपींची सखोल चौकशी केली असता, त्यांनी सदरची हिरो होंन्डा पॅशन गाडी व इतर १० गाडया नाना पेठ, नरपतगिरी चौक, लष्कर, गणेश पेठ, चंदननगर, हडपसर येथुन चोरी केल्या असल्याचे सांगितले. नमुद आरोपींकडुन त्यांच्या ताब्यात असलेली हिरो होंडा पॅशन गाडी व इतर १० दुचाकी जप्त करण्यात आलेल्या आहेत.

आरोपींकडुन जप्त केलेल्या गाड्यांबाबत १)समर्थ पोलीस स्टेशन येथे ३ गुन्हे, २)हडपसर पोलीस स्टेशन येथे २ गुन्हे ३) चंदननगर पोलीस स्टेशन येथे १ गुन्हा, ४) फरासखाना पोलीस स्टेशन येथे १ गुन्हा, ५)लष्कर पोलीस स्टेशन येथे १ गुन्हा, असे एकुण ८ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असुन उर्वरीत ३ गाडयांबाबत तपास चालु आहे.

सदरची कामगिरी मा.श्री रविंद्र सेनगावकर सो,अप्पर पोलीस आयुक्त,दक्षिण प्रादेशिक विभाग,पुणे शहर, मा.श्री प्रविण मुंढे सो, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२, पुणे शहर, मा.श्री निलेश मोरे सो,सहायक पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली समर्थ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक अतकरे, पोलीस हवालदार सुशिल लोणकर, पोलीस शिपाई गणेश कोळी, पोलीस शिपाई अनिल शिंदे, पोलीस शिपाई साहील शेख, पोलीस शिपाई निलेश साबळे, पोलीस शिपाई बाळासाहेब भांगले, पोलीस शिपाई हराळ यांनी केली आहे.